# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

"राज्य सरकार तर्फे मेट्रो प्रकल्प करता भरीव तरतूद"

पुणे १० : : शुक्रवार दिनांक ०९ मार्च २०१८ रोजी महाराष्ट्र राज्य सरकारने आपले अर्थसंकल्प विधान सभेत सादर केले. राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सादर केलेल्या अर्थ संकल्पात राज्य सरकारने राज्यातील नागपूर आणि पुणे मेट्रो प्रकल्पांकरिता ४४० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यात नागपूर मेट्रो प्रकल्पाकरिता ३१० कोटी तर पुणे मेट्रो प्रकल्पाकरिता १३० कोटी रुपए मंजूर केलेत. राज्य सरकारने नागपूर मेट्रो प्रकल्पाकरिता मागितलेल्या ८५० कोटींपैकी ३१० कोटींची रक्कम मंजूर केली आहे. यापैकी २५० कोटी हे Equity करता तर ६० कोटी कर्जव्यवस्थेकरता देण्यात आली आहे. महा मेट्रोने Equity करता ५०० कोटी तर कर्जव्यवस्थेकरता ३५० कोटींची मागणी केली होती.

राज्य सरकारने गेल्यावर्षीच्या तुलनेत अर्थसंकल्पाच्या तरतुदीमध्ये ५० कोटीने वाढ केली असून मागच्या वर्षी सरकारने मेट्रो प्रकल्पांकरिता २०० कोटींची तरतूद केली होती.

त्याच प्रमाणे राज्य सरकारने पुणे मेट्रो रेल प्रकल्पाकरिता मागितलेल्या ८५० कोटी पैकी १३० कोटींची रक्कम मंजूर केली आहे. यापैकी १०० कोटी Equity करता तर ३० कोटी कर्जव्यवस्थेकरता देण्यात आली आहे. महा मेट्रोने पुणे मेट्रो प्रकल्पाकरता Equity साठी ५५० कोटी तर कर्जव्यवस्थेकरता ३०० कोटी इतकी रक्कम माघितली होती. नागपूर प्रमाणेच या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी पुणे मेट्रो प्रकल्पाकरिता देखील २० कोटीची वाढीव तरतूद केली असून माघील अर्थसंकल्पात ८० कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली होती.

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड अंतर्गत नागपूर आणि पुणे मेट्रो प्रकल्पांकरिता अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली आहे. उरलेली रक्कम प्रकल्पाचे काम सुरु असताना या आर्थिक वर्षात राज्य सरकार तर्फे दिली जाणार आहे.